## महाराष्ट्र राज्याकरिता

# ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचा सुधारित निकषांचा मसुदा

## नियंत्रण कालावधी जुलै २०२६ ते जून २०२९

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

३० एप्रिल २०२६

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY
MWRRA
DOMESTIC • AGRICULTURE • INDUSTRY

## नियंत्रण कालावधी सन २०२६-२९ साठी ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे सुधारित निकष

### १. पार्श्वभूमी:

१.१ महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (मजनिप्रा) अधिनियम, २००५ (यापुढे अधिनियम म्हणून संदर्भित) महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे विनियमन करण्याच्या हेतूने तसेच राज्यातील जलसंपत्तीचे कुशल, समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन, वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि त्याची सुनिश्चिती करण्याकरिता लागू करण्यात आला होता. सदर अधिनियम राज्य शासनाच्या अधिसूचना क्र. समिती - २००५/(७२/०५)/१/जसंअ दि. ०८.०६.२००५ अन्वये अंमलात आला. त्यानंतर, अधिनियमातील विनिर्दिष्ट कार्ये पार पाडण्यासाठी अधिसूचना क्र. मजनिप्रा निवड २००५/७८/०५ दि.१२.०८.२००५ अन्वये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (यापुढे प्राधिकरण म्हणून संदर्भित) ची स्थापना करण्यात आली.

१.२ प्रत्येक नदी खोऱ्यातील लाभार्थींच्या किंवा उपभोक्त्यांच्या मतांची खात्री करुन घेतल्यानंतर, सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय, कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसूली परावर्तित होईल अशा तऱ्हेने पाण्याची दर पध्दती (जल प्रशुल्क पध्दती) ठरविणे आणि उपखोरे, नदी खोरे आणि राज्यस्तरावरील पाणीपट्टी आकारण्याचे निकष ठरविणे हे प्राधिकरणाचे अधिकार, कार्ये आणि कर्तव्यांपैकी एक [अधिनियमातील कलम ११(घ)] आहे. या तरतुदीनुसार उपखोरे, नदीखोरे आणि राज्यस्तरावर जल प्रशुल्क पध्दती आणि त्यासाठीचे निकष निश्चित करावे लागणार आहेत. प्राधिकरणाने राज्यातील जल प्रशुल्कात समानता असावी या हेतूने फक्त राज्यस्तरीय जल प्रशुल्क निर्धारणाचे निकष निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे.

१.३ अधिनियमातील कलम ११(प) नुसार प्राधिकरण दर तीन वर्षांनी पाणीपट्टीचे पुनर्विलोकन व पुर्नरिक्षण करील.

१.४ अधिनियमातील कलम ३१ चा उपकलम १, कलम ११ मधील उपकलम (घ) व (प) चे एकत्रित वाचन केल्यास त्याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन जलसंपदा विभागाचे मान्यतेनंतर प्राधिकरणाने दि. १५.१०.२०१३ रोजी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन

प्राधिकरण (ठोक जल प्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे) विनियम, २०१३ अधिसूचित केले होते.

**१.५** जानेवारी, २०१८ मध्ये दुसरे जल प्रशुल्क आदेश निर्गमित केल्यानंतर, प्राधिकरणाने पूर्वानुभवाच्या आधारे राजपत्रातील भाग ४ (क) दि. २४.०५.२०१९ रोजीच्या स्वतंत्र अधिसूचनेद्वारे सदर जलप्रशुल्क निर्धारणाचे विनियम निरसित केले. तदनंतर, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (शुल्क, आकार व अन्य प्राप्ती) विनियम, २०१९ दि. २९.०८.२०१९ रोजी अधिसूचित करण्यात आला. यापाठोपाठ प्राधिकरणाने, ठोक जलप्रशुल्क निर्धारणाची पारदर्शक व सातत्यपूर्ण कार्यपद्धत निश्चित करण्याच्या उद्देशाने व तिचे नियतकालिक पुनर्विलोकन व पुर्नरिक्षण करण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (ठोक जलप्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे) मार्गदर्शक सूचना, २०१९ दि. १४.११.२०१९ रोजी अधिसूचित केल्या. या दरम्यान प्राधिकरणाने सन २०२०-२३ करीता ठोक जलप्रशुल्क निर्धारणासाठीचा दृष्टीनिबंध ( Approach Paper ) ऑक्टोबर २०१९ मध्ये केला. या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीचे पालन करून, प्राधिकरणाने, दिनांक २९ मार्च २०२२ च्या आदेशान्वये, कोविड-१९ महामारीच्या प्रभावामुळे २०२० चे विद्यमान दर आणखी दोन वर्षांसाठी कायम ठेवत, नियंत्रण कालावधी २०२२-२५ साठी सुधारित पाणी दर जारी केले. शिवाय, सरकारच्या विनंतीनुसार, या आदेशाअंतर्गत दरांसाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली.

**१.६** प्रचलित जल प्रशुल्क सन २०२२ ते २०२५ पर्यंत लागू होते, तेच दर जून २०२६ पर्यंत लागू केले. प्राधिकरणाने जल प्रशुल्काच्या व पुनर्विलोकनाची प्रक्रिया नव्याने सुरु केली आहे. वर्ष २०२०-२१, २०२१-२२ आणि २०२२-२३ च्या सिंचन स्थितीदर्शक अहवालामध्ये उपलब्ध असलेल्या आधारभूत माहितीचा आढावा घेतला व दृष्टिनिबंधामध्ये ठरविल्याप्रमाणे प्राधिकरणाने हा प्रारूप ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे निकषांचा प्रस्ताव तयार केला. सल्लामसलत प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यातील सल्लामसलत निवडक तज्ञ समुहांसमवेत सप्टेंबर २०२४, मध्ये केली. तज्ञ समुहांतील विविध तज्ञांचे प्राप्त अभिप्राय/सूचनांमधील योग्यता विचारात घेवून प्राधिकरणाने सदर निकषाचा मसुदा दुसऱ्या टप्प्यातील लाभार्थी जनतेशी करावयाच्या सल्लामसलतीसाठी सुधारित केला.

**१.७** तज्ञ समुहाचे अभिप्राय विचारात घेऊन त्यानुसार प्राधिकरणाने केलेल्या जल प्रशुल्क निर्धारणाच्या निकषांचा सुधारित मसुदा व त्यानुसार केलेला ठोक जल प्रशुल्क प्रस्तावाचा

मसुदा असे दोन्ही मसुदे प्राधिकरणाच्या “www.mwrra.maharashtra.gov.in” या संकेतस्थळावर अधिनियमातील कलम ११(घ) नुसार लाभार्थ्यांच्या मतांची खात्री करुन घेण्यासाठी ठेवण्यात येतील व तसेच दोन मराठी व एका इंग्रजी दैनिकामध्ये प्रसिध्द करण्यात येतील. संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या मुदतीत लाभार्थ्यांकडून अभिप्राय / सूचना मागविण्यात येतील. याशिवाय दोन्ही मसुद्यांच्या प्रती क्षेत्रीय विभाग / उपविभागीय कार्यालयात लाभार्थ्यांकरिता उपलब्ध ठेवण्यासाठी पाचही पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांना पुरविण्यात येतील व त्यांना विनंती करण्यात येईल की त्यांनी मसुद्याच्या प्रति लाभार्थ्यांचे / हितचिंतकांचे अभिप्राय प्राप्त करण्यासाठी त्यांच्या विभागीय व उपविभागीय कार्यालयात उपलब्ध ठेवाव्यात. तसेच मसुद्यांच्या प्रति संबंधित शासकीय विभागाकडे पाठविण्यात येतील. लाभार्थ्यांना त्यांचे अभिप्राय ई – मेलद्वारे / पोस्टाने प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध व्यवस्थेनुसार सादर करण्याचा पर्याय देण्यात येतील.

१.८ उपभोक्त्यांकडून प्राप्त झालेले अभिप्राय विचारात घेऊन प्राधिकरण ठोक जल प्रशुल्क निर्धारणाच्या निकषाचा मसुदा आणि ठोक जल प्रशुल्क प्रस्ताव अंतिम करेल.

१.९ प्राधिकरणाने अंतिम केलेले दर १ जुलै, २०२६ ते ३० जून, २०२७ पर्यंत लागू राहतील. त्यानंतर पुढील वर्षांमध्ये हे दर दरवर्षी १०% ने वाढविले जातील.

## २. <u>सेवा पुरवठादारांच्या जबाबदाऱ्या:</u>

(जलसंपदा विभाग आणि नदीखोरे अभिकरण /पाटबंधारे विकास महामंडळ)

२.१ पाण्याचे दर ठरवण्यासाठी “ई-गव्हर्नन्स मोड्यूल” विकसित करणे आवश्यक आहे.

२.२ सांडपाणी प्रक्रिया संयंत्राच्या पासून ५० कि.मी. परिघात असलेल्या औष्णिक विदयुत प्रकल्पांनी केंद्र शासनाच्या धोरणाचा स्वीकार केला पाहिजे. त्यांनी प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरणे अनिवार्य आहे.

२.३ “प्रदूषण करणाऱ्यांनी किंमत चुकवावी,” या तत्वावर केलेल्या जल लेखापरीक्षणाच्या/ सक्षम संस्थेने जारी केलेले पाणी गुणवत्तेचे प्रमाणपत्राच्या आधाराने प्रवर्गासाठी दंड आकारायच्या पाण्याचे परिमाण हे नदी खोरे अभिकरण ठरवील.

२.४ वितरण व्यवस्थेच्या शेवटी असलेल्या शेतकऱ्यांना पाणी मिळावे याची खात्री करण्यासाठी नदी खोरे अभिकरण यांनी पुच्छ ते शीर्ष सिंचन (टेल टू हेड) हे तत्व सिंचनामध्ये अंगीकारावे.

२.५ महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम २२ च्या तरतुदींनुसार नदी खोरे अभिकरण यांनी संयुक्त तपासणी करुन दुरुस्त्या कराव्यात व पाणी वापर संस्थांकडे (पा.वा.सं) व्यवस्थापन सोपवावे.

२.६ पाणी वापर संस्थांचे कार्य परिणामकारकरित्या व्हावे यासाठी नदी खोरे अभिकरणांनी पाणी वापर संस्थांच्या क्षमता बांधणीसाठी उपक्रम राबवावेत.

२.७ जलसंपदा विभागाने नदी खोरे अभिकरण यांना निकषांची व जलप्रशुल्क आदेशांची अंमलबजावणी व संनियंत्रण अनिवार्य करावे व त्यासाठी उद्दिष्टे ठरवून द्यावीत.

२.८ स्थानिक स्वराज्य/स्वायत्त संस्था व उद्योगधंदे यांनी निर्माण केलेल्या सर्व सांडपाण्यावर सांडपाणी प्रक्रिया यंत्रांनी १००% प्रक्रिया करणे आवश्यक आहे व असे प्रक्रिया केलेले पाणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळांच्या संमतीच्या अटींची पूर्तता करणारे असले पाहिजे.

२.९ पाण्याचे दर ठरविण्यासाठी विहित प्रपत्रे जलसंपदा विभागाने नदीखोरे अभिकरण यांचेकडून घ्यावीत व संकलित माहिती, मार्गदर्शक तत्वे २०१९ नुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास निर्धारित मुदतीत सादर करावी.

२.१० कृषी क्षेत्रांच्या पाणीपट्टी वसुलीबाबतची कामगिरी अत्यंत कमी आहे व त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे. जलसंपदा विभागाने सिंचन विकास महामंडळ यांना वसुली वाढविण्याचे उद्दिष्ट घालून दिले पाहिजे. सिंचन विभागामधील बिलिंग व महसूल वसुली प्रक्रियेचे ई - प्रणाली करण (Digitisation)/संगणकीकरण करणे अत्यंत आवश्यक असून कार्यक्षमता, पारदर्शकता व आर्थिक शिस्त सुनिश्चित करण्यासाठी ते अपरिहार्य आहे. मूल्यांकन, बिलनिर्मिती, वसुली, देखरेख व ताळमेळ यांचा समावेश असलेली सर्वसमावेशक व अखंड संगणकीकृत प्रणाली विकसित करून ती एक वर्षाच्या निश्चित कालावधीत अंमलात आणणे आवश्यक आहे. यामुळे महसूल संकलन व वसुली चक्रावर संपूर्ण नियंत्रण प्रस्थापित होईल, गळती कमी होईल, वसुली कार्यक्षमता वाढेल, तत्काळ देखरेख सुलभ होईल व सर्व स्तरांवर जबाबदारीची जाणीव दृढ होईल.

२.११ महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या नदी खोरे अभिकरण यांनी द्यावयाच्या घरगुती व औद्योगिक पाणी हक्कदारी वितरणासाठी सप्टेंबर, २०१७ मध्ये घालून दिलेल्या निकषांनुसार मुख्य लेखा परिक्षकाने जललेखापरीक्षण करावे व तो अहवाल सारांश अहवालासह जलवर्ष पूर्ण झाल्यानंतर दर वर्षी ३० सप्टेंबरपर्यंत नदी खोरे अभिकरण व प्राधिकरण यांना सादर करावे.

२.१२ शासन निर्णय दिनांक २३.०७.२००१ नुसार पाणी वापर संस्थांकडून जल शुल्क वसुलीचा परतावा सेवा पुरवठा दराने वसुली झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत करण्यात यावा.

२.१३ जल प्रदूषण ही वाढती चिंता आहे आणि नदी खोरे अभिकरणाने जल गुणवत्ता प्रमाणपत्र यंत्रेणेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यामधील काही तांत्रिक आव्हाने प्राधिकरणाकडे कळवलेली आहे. या आव्हानांना समोर जाण्यासाठी निर्धारित वापरासाठी पुरवल्या जाणाऱ्या पाण्याच्या गुणवत्तेची चाचणी करण्याकरिता प्रादेशिक स्तरावर प्रयोगशाळा स्थापन / नियुक्त करण्याचा प्रस्ताव आहे. या प्रयोगशाळांनी दिलेल्या चाचणीच्याआधारे नदी खोरे अभिकरण पाण्याची गुणवत्ता निश्चित करेल आणि विहित मानकांची पडताळणी व अनुपालनासाठी आवश्यक ती कारवाई करेल.

२.१४ पाण्याच्या वापराच्या मंजूर प्रवर्गानुसार दर आकारले जातील. जर एखाद्या विशिष्ट प्रवर्गासाठी वाटप केलेले पाणी योग्य ती परवानगी न घेता आणि पायाभूत सुविधांशिवाय इतर कोणतेही प्रवर्गात वापरले गेले तर असा वापर हा अनधिकृत मानला जाईल. अशा प्रकारामध्ये लागू होणारे दर हे त्या प्रवर्गातील महत्तम दर असतील आणि दर पत्रकात नमूद केल्यानुसार दंडणीय दर देखील आकारले जातील.

उदाहरण:-

घरगुती प्रवर्गाअंतर्गत वाटप केलेले पाणी औद्योगिक प्रवर्गासाठी वापरल्यास, वापरलेल्या संपूर्ण पाण्यावर लागू औद्योगिक दर आकारला जाईल आणि दराचे आदेशात विहित केल्यानुसार दंडात्मक शुल्क आकारले जाईल.

## ३ संबंधित कायदे व इतर आधारभूत दस्ताऐवज :

सदर मसुदा निकष खालील तरतुदींच्या अनुषंगाने तयार केला आहे;

क) मजनिप्रा अधिनियम, २००५ वेळोवेळी केलेल्या सुधारणांसह

ख) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ (मपाअ १९७६)

ग) महाराष्ट्र प्रादेशिक नगर नियोजन अधिनियम १९६६ (MRTP Act १९६६)

घ) महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतक-यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ (मसिंपशेव्य अधिनियम, २००५)

च) महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९

छ) मजनिप्रा (ठोक जल प्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे) मार्गदर्शक सूचना, २०१९ (यापुढे मार्गदर्शक सूचना २०१९ म्हणून संदर्भित)

ज) ठोक जल प्रशुल्क निर्धारण २०२६-२९ यावर दृष्टिनिबंध (एप्रिल, २०२४) (यापुढे दृष्टिनिबंध, एप्रिल २०२४ म्हणून संदर्भित)

झ) सिंचन स्थिती दर्शक अहवाल २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४

ट) महाराष्ट्र राज्य आर्थिक सर्वेक्षण अहवाल २०२३-२४

ठ) अद्ययावत उपलब्ध किमान आधारभूत किंमत, २०२४-२५ साठी

ड) नदी खोरे अभिकरणाद्वारे, यांनी घरगुती व औद्योगिक कारणांसाठी पाणी हक्कदारी वितरणाचे
निकष, सप्टेंबर २०१७

ढ) केंद्रीय भूजल प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचना दि. २४/०९/२०२० (१० दलघमी प्रति दिन बाबत )

ण) केंद्रीय भूजल प्राधिकरणाची अधिसूचना १३/०७/२०२१ (विहिरींच्या सुरक्षेबाबत)

## ४ जलप्रशुल्क आदेशाची प्रयोज्यता (Applicability) :

प्राधिकरणाचे जल प्रशुल्क आदेश, महाराष्ट्र राज्यातील संबंधित कार्यक्षेत्रातील सर्व ठोक पाणीपुरवठा गट [Bulk Water Supply Entity (BWSE)] आणि ठोक पाणी वापरकर्ता असलेला वैयक्तिक शेतकरी यासह अन्य ठोक पाणी वापरकर्ता गट [Bulk Water User Entity (BWUE)] अथवा अन्य कोणताही संबंधित वापरकर्ता यांस, नियंत्रण कालावधीसाठी आणि त्यास प्राधिकरणाने दिलेल्या मुदतवाढ/मुदत वाढीसाठी, जल प्रशुल्कामध्ये केलेल्या वार्षिक अथवा न केलेल्या वाढीसह लागू राहतील. तसेच वार्षिक वाढ ही दहा टक्के असून किंवा प्राधिकरणाच्या विशेष अधिकारांचा वापर करून प्राधिकरण ठरवेल.

याशिवाय, अन्य सार्वजनिक किंवा खाजगी क्षेत्रातील कंपनी, संघटना, संस्था इत्यादी अन्य गटाच्या मालकीच्या किंवा व्यवस्थापन होत असलेल्या जलसंपदा प्रकल्पातून ठोक पाणी पुरवठा होत असल्यास अशा सर्व ठोक पाणी पुरवठा गटास व ठोक पाणी वापर गटास,

दृष्टिनिबंधामधील विहित केलेल्या पद्धतीनुसार पारित केलेले राज्यस्तरीय जलदर आदेश लागू राहतील.

## ५. निकषांची वैधता :

हे निकष दि. ०१.०७.२०२६ ते दि. ३०.०६.२०२९ या तीन वर्षाच्या नियंत्रण कालावधीसाठी वैध राहतील. प्राधिकरणाने अधिनियमातील कलम ११ (प) नुसार आणि कलम ११ (घ) नुसार जुलै २०२६ ते जून २०२९ या काळात प्रचालन व परिक्षणावर होऊ शकणारा खर्च लक्षात घेऊन प्रचलित दरांचे पुनर्विलोकन केले आहे.

हे निकष ज्या वर्षी जलप्रशुल्क आदेश दिला आहे, त्या जललेखा वर्षापासून (जललेखा वर्ष परिच्छेद २(१४), मार्गदर्शक सूचना २०१९, प्रमाणे) तीन वर्षांसाठी वैध राहतील. या निकषांना अंतिम रूप देण्यासाठी प्राधिकरणाने मार्गदर्शक तत्वे २०१९ च्या परिच्छेद तीन मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीचे अवलंब करेल.

## ६. सेवा पुरवठादाराकडून ठोक जलप्रशुल्क प्रस्ताव:

मार्गदर्शक सूचनांच्या कलम ३(२) नुसार ठोक पाणी पुरवठा गटाने आधारभूत माहितीसह ठोक जलप्रशुल्क प्रस्ताव दि. २४.०२.२०२६ रोजी सादर केले आहे.

## ७. स्वीकृत प्रचालन व परिरक्षण खर्च:

**७.१** अधिनियमातील कलम ११ (घ) नुसार स्वीकृत प्रचालन व परिरक्षण खर्चामध्ये राज्यातील जलसंपदा प्रकल्पांचा सिंचन व्यवस्थापन, प्रशासकीय, कार्यचालन व परिरक्षण खर्च अंतर्भूत आहेत. प्राधिकरण राज्य जलनीती, २०१९ मधील खालील मार्गदर्शक तत्वांचे पालन करील.

"आवर्ती खर्चात, योजनेच्या प्रणालीतील चिरंतन लाभ मिळण्याचे सुनिश्चिती, पाण्याचा कार्यक्षम वापर, पाणी वापरकर्त्यांना हक्काचे पाणी मिळण्यासाठी आवश्यक प्रणालीची उपलब्धता आणि पाण्याचे समन्यायी वाटप यासाठी आवश्यक, वीजखर्चासह कार्यान्वय व परिरक्षण खर्च, सुटे भाग, व्ययशील बाबी, आस्थापना व प्रशासकीय खर्च, वरकड खर्च तसेच पायाभूत सुविधा घटकांच्या पुन:स्थापना खर्चासह (उदा. नियंत्रक दरवाजे इ.) विशेष दुरुस्तीच्या (संरचना पुन:स्थापनेचा व पुनर्जोडणीचा) खर्चाचा समावेश असेल".

मार्गदर्शक सूचना, २०१९ मध्ये स्वीकृत प्रचालन व परिरक्षण खर्चाशी संबंधित परिभाषित शब्दांच्या केलेल्या व्याख्या खालील प्रमाणे आहेत;

**<u>मार्गदर्शक तत्वे –</u>**

*मार्गदर्शक तत्व २(२) स्वीकृत प्रचालन व परिरक्षण खर्च म्हणजे संबंधित जलस्रोत प्रकल्पांचे परिचालन करणे व परिरक्षण करणे यासाठी घाऊक प्रमाणात पाण्याचे वितरण करणे यासाठी होणारा खर्च. यामध्ये सिंचनाचे व्यवस्थापन, प्रशासन, प्राधिकरणाने राज्यातील स्वीकृत केलेल्या जलस्रोत प्रकल्पांचे प्रचालन व परिरक्षण यांचा खर्च याचा समावेश होतो.*

असे दिसून येते की, ठोक जल वापरकर्ते मोठ्या प्रमाणात पाणी पोहोचवण्याची प्रक्रिया महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्याकडून व्यवस्थापन अधिनियमाद्वारे नियंत्रित केली जाते. महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्याकडून व्यवस्थापन अधिनियम कलम २२ अन्वये जलसंपदा प्रकल्प आणि कालवा प्रणालीच्या दुरुस्ती व पुनर्वसनाची तरतूद आहे. त्यावरून असे दिसून येते की, पाणी वापरकर्त्यांना हस्तांतरण करण्यापूर्वी कालव्याची दुरुस्ती व पुनर्वसन करणे आवश्यक आहे. त्यामुळे कलम २२ अन्वये येणारा खर्च हा मान्य केलेल्या संचालन आणि देखभाल खर्चाच्या एक आवश्यक घटक बनतो.

*मार्गदर्शक तत्व २ (१५) “प्रशासकीय खर्च” याचा अर्थ, विभागीय कार्यालय व वरिष्ठ स्तरावरील कार्यालयांनी केलेला प्रशासकीय खर्च असा आहे, ज्यात केवळ सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासनासाठी प्रत्यक्ष नेमलेल्या कर्मचा-यांचे वेतन व भत्ते आणि लेखा मानकांनुसार प्रशासकीय शिर्षाखालील अनुज्ञेय नसून यात अन्य तत्सम खर्चाचा सुध्दा समावेश असेल, असा आहे.*

*मार्गदर्शक तत्व २ (१६) "सिंचन व्यवस्थापन खर्च” याचा अर्थ, सिंचन व्यवस्थापन शाखा कार्यालये व उप विभागीय कार्यालयाचा खर्च असा असून तो केवळ कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते, पाणी पाळीच्या वेळी नेमलेल्या अनुषंगिक क्षेत्रीय कर्मचाऱ्यांवर झालेला खर्च, कार्यालयीन खर्च, लेखन साहित्य खर्च, जाहिरात खर्च, वाहनांवरील खर्च, संकीर्ण साहित्य खरेदी, पाणी वापर संस्था स्थापनेवरील खर्च, त्यांचे प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रमावरील खर्च नसून, पीक मोजणी, पाणीपट्टी आकारणी व वसुली इ. बाबींवरील केलेल्या खर्चापुरता मर्यादित नसून यात अन्य तत्सम खर्चाचा सुध्दा समावेश असेल, असा आहे.*

*मार्गदर्शक तत्व २ (१७) “परिरक्षण खर्च" याचा अर्थ, कार्यचालन परिरक्षण व प्रतिबंधात्मक परिरक्षणावरील खर्च, असा आहे.*

*मार्गदर्शक तत्व २ (१८) “कार्यान्वयन खर्च" याचा अर्थ, उपसा सिंचन योजनांवरील विद्युत आकार, सुटे भाग, वापराअंती संपुष्टात येणा-या बाबी यासारख्या अन्य बाबींवरील*

*खर्चापुरताच मर्यादित नसून यामध्ये प्राधिकरणाच्या मतानुसार आवश्यक अशा अन्य बाबींवरील खर्चाचा समावेश असेल, असा आहे:*

*मार्गदर्शक तत्व २ (१९) "परिचालन परिरक्षण खर्च" याचा अर्थ, पंपाद्वारे धरणाच्या गॅलरीमधील झिरप्याचे पाणी काढणे, कालव्यातील गाळ, गवत, रानटी झुडपे काढून कालव्याची वहन क्षमता पूर्ववत करणे, कालव्याचे फुटलेले भाग पूर्ववत करणे, पाण्याची गळती टाळण्यासाठी कालव्यावरील बांधकामाची दुरुस्ती करणे, खराब झालेले रबर सील व स्टेम रॉड बदलणे, प्रचलन कर्मचा-यांसाठीच्या निवासी व अनिवासी इमारतींचा दुरुस्ती खर्च यापुरताच मर्यादित न घेता यात प्राधिकरणाच्या मतानुसार आवश्यक अशा अन्य तत्सम बाबींवर होणाऱ्या खर्चाचा समावेश असेल, असा आहे;*

*मार्गदर्शक तत्व २ (२०) "प्रतिबंधात्मक परिरक्षण खर्च" याचा अर्थ, रंगकाम, शिर्ष कामे, उपसा सिंचन योजना आणि कालव्यावरील नियंत्रण बांधकामे यांच्या विद्युत व यांत्रिकी चल भागांना वंगण करणे, पाण्याचे गळती मार्गावर उपाययोजना करणे. पाण्याचे गळती मार्ग तयार झाल्याने भराव फुटण्याचा धोका टाळण्याकरिता भरावामधून होणारी गळती रोखणे, सांडव्याचा पुच्छ मार्गातील धूप कमी करणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, दगडी बांधकामातील खराब झालेले सांधे (Pointing) पूर्ववत करणे इ. बाबींवरील खर्च यापुरताच मर्यादित न घेता यात प्राधिकरणाच्या मतानुसार आवश्यक अशा अन्य तत्सम बाबींवर होणाऱ्या खर्चाचा समावेश असेल, असा आहे:*

यामधे पाणी वापर संस्थांसाठीच्या सिंचन वितरण व्यवस्थेच्या परिक्षणाच्या खर्चाचा समावेश होतो.

**७.२** दृष्टिनिबंध (एप्रिल २०२४) मधील तरतुदीनुसार उपरोक्त सर्व घटकांचा एकत्रित खर्च उपभोक्त्यांसमोर दोन टप्प्यांमध्ये अभिप्रायार्थ ठेवण्यात येईल. प्राप्त झालेल्या अभिप्राय/सूचना विचारात घेऊन प्राधिकरण जी प्रचालन व परिरक्षणाची संपूर्ण रक्कम दरनिर्धारणासाठी निश्चित करील त्यास "स्वीकृत प्रचालन व परिरक्षण खर्च" म्हणून गणले जाईल.

## ८. <u>वापरकर्त्यांच्या प्रवर्गांचे पुनर्विलोकन:</u>

पूर्वीच्या जल प्रशुल्क आदेशामध्ये फक्त तीन वापरकर्त्यांचे प्रवर्ग म्हणजेच घरगुती, औद्योगिक आणि कृषी विचारात घेतले होते. घरगुती प्रवर्गामध्ये व्यापारी उपप्रवर्ग फक्त महानगरपालिकेअंतर्गत सुरू केला आहे. यापुढे, महानगरपालिकांसह नगरपालिका /नगर

परिषदांच्या घरगुती प्रवर्गामध्ये व्यापारी उपप्रवर्ग लागू राहील. ग्रामपंचायत आणि नगरपंचायतीच्या बाबतीत, दररोज दहा घनमीटर किंवा त्याहून अधिक पाणी घेणाऱ्या व्यावसायिक संस्थांना देखील घरगुती वापरासोबतच व्यावसायिक प्रवर्गामध्ये गणले जाईल. मार्गदर्शक सूचना, २०१९ मध्ये परिच्छेद २(१३) दिलेली व्यापारी पाणी वापराची व्याख्या खालीलप्रमाणे-

"व्यापारी पाणी वापर" याचा अर्थ, ज्यांना व्यापारी वापराकरिता पाणी पुरविले जाते अशा पाणी वापर गटाकडून झालेला पाणी वापर (परंतु यापुरतेच मर्यादित नाही) उदा. उपहारगृहे, हॉटेल्स, वॉटर स्पोर्ट/रिसॉर्ट, पोहण्याचे तलाव, मॉल्स, रुग्णालये, स्टेडीयम्स, बांधकामे, इ., अशा आणि प्राधिकरण वेळोवेळी व्यापारी वापराचे प्रवर्गाखाली गणना करेल अशा कोणत्याही क्रियेसाठीचा पाणी वापर.

"औद्योगिक घटकांमधील घरगुती पाणी वापर" म्हणजे उद्योगांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रात विकसित केलेले आणि पुरवलेले निवासी औद्योगिक वसाहतीतील सर्व प्रकारच्या घरगुती कारणासाठी वापरलेले पाणी.

"घरगुती घटकांमधील औद्योगिक वापर" म्हणजे नागरी स्थानिक संस्थांनी (ULBs) त्यांच्या कार्यक्षेत्रातील उद्योगांना पुरविलेले पाणी.

"घरगुती घटकांमधील व्यापारी वापर" म्हणजे नागरी स्थानिक संस्थांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रात व्यापारी कारणास्तव वापरलेले पाणी.

ठोक जल पुरवठा गटाने सदर वापर निश्चित करुन मंजूर करावा आणि आवश्यकतेनुसार स्वतंत्र मीटर बसविण्यासह पायाभूत सुविधा इत्यादींबाबत पूर्तता केल्यानंतर करारात तशी तरतूद करावी.

९. <u>शासकीय अर्थसहाय्य</u> (Subsidy):

महाराष्ट्र जलसंपत्ती नियम प्राधिकरण अधिनियम, २००५ व राज्य जलनिती २०१९ नुसार प्रचालन व परिरक्षण खर्च भागवण्याकरिता ठोक पाणी वापरकर्त्यांकडून वसुली करणे अनिवार्य आहे.

तथापि, सरकार समाजातील वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना पाणीपट्टीवर अनुदान देऊ शकते असे अनुदान सुयोग्य, पारदर्शक असावे आणि त्याची रचना अशा प्रकारे केली जावी की, आर्थिक स्थिरता व पाण्याचा कार्यक्षम वापर या तत्त्वांना धक्का न लावता सुनिश्चित होईल.

१०. <u>प्रचालन व परिरक्षण खर्चाची विभागणी</u>:

नियंत्रण कालावधी २०२२-२५ साठी काही घटकांवर (Parameters) आधारित तीन वापरकर्त्यांच्या प्रवर्गामध्ये प्रचालन व परिरक्षण खर्चाची विभागणी असलेल्या निकषावर तसेच जल प्रशुल्क प्रस्तावावर, वापरकर्त्यांसमवेत सल्लामसलत प्रक्रिया पार पाडल्यानंतर तर्कसंगत जल प्रशुल्क आदेश दि. २९.०३.२०२२ रोजी प्राधिकरणाद्वारे निर्गमित करण्यात आले. नियंत्रण कालावधी २०२६-२९ साठीचा अंदाजित देखभाल आणि दुरुस्तीचा खर्च सरकारकडून प्राप्त झालेल्या दर प्रस्तावावर आधारित असेल, वार्षिक दरवाढ ही खर्च चलनवाढ निर्देशांक, घाऊक चलनवाढ निर्देशांक इ. अनुदान आणि परिच्छेद ९ मध्ये नमूद केलेनुसार पाणी वितरण प्रणालीसाठीचा देखभाल आणि दुरुस्ती खर्च, कालावधी २०२६ ते २०२७ साठीच्या स्वीकृत अंदाजित देखभाल दुरुस्ती खर्चात विचारात घेतला जाईल. हा अंदाजित देखभाल दुरुस्तीचा खर्च मूळ दर आणि स्रोतनिहाय लागू दर निश्चित करण्यासाठी वापरकर्त्यांच्या तीन प्रवर्गामध्ये विभागला जाईल. मूळ दराच्या चलनवाढीमध्ये सवलती आणि दंडाचा समावेश नाही. प्रचालन व परिरक्षण खर्चाची विभागणी ही, (अ) परवडण्याची क्षमता, (ब) प्रमाण व सुलभ उपलब्धता, (क) समयोचितता आणि (ड) पाण्याच्या गुणवत्तेवरील परिणाम या चार मूलभूत घटकांवर आधारित कृषी, घरगुती आणि औद्योगिक या वापराच्या तीन प्रवर्गामध्ये करण्यात आली. सदर घटकांना खालील भारांकन टक्केवारी देण्यात आली;

| मुलभूत घटक (Parameters) | | भारांकन टक्केवारी |
|---|---|---|
| (अ) परवडण्याची क्षमता | - | ६०% |
| (ब) प्रमाण व सुलभ उपलब्धता | - | १०% |
| (क) समयोचितता | - | १०% |
| (ड) पाण्याच्या गुणवत्तेवरील परिणाम | - | २०% |

वरील मुलभूत घटकांची भारांकन टक्केवारी वापराच्या प्रत्येक प्रवर्गाच्या तर्क आधारित प्रत्येक घटकाच्या विभागणीस लागू केल्यामुळे त्याची परिणती तीन वापरकर्त्यांच्या

प्रवर्गामध्ये, प्रचालन व परिरक्षण खर्च लाभार्थ्यांशी विभागण्यात झाली. प्रचालन व परिरक्षण खर्चाच्या विभागणीचा अभ्यास २०१३ मध्ये केला गेला व लाभार्थ्यांशी सल्लामसलत करुन तो पुढीलप्रमाणे आहे - कृषीसाठी १९%, घरगुतीसाठी २२% व उद्योगासाठी ५९%. नियंत्रण कालावधी २०२२-२५ च्या जलप्रशुल्क आदेशातील **खर्चाच्या विभागणीची टक्केवारी २०२६-२९ करिता तशीच ठेवण्याचे प्रस्तावित आहे. म्हणजेच कृषीसाठी १९%, घरगुतीसाठी २२% व उद्योगासाठी ५९%.**

## ११. जलप्रशुल्क निश्चित करण्यासाठीची तत्त्वे आणि पध्दत :

### ११.१ कृषी :

#### ११.१.१ मूळ दर:

प्रवाही सिंचनासाठी - मूळ दर हा प्रचालन व परिरक्षण खर्चाच्या १९% असेल, आणि तो कृषी क्षेत्राला लागू असेल. रब्बी हंगामासाठी वैयक्तिक लाभार्थ्यांचा दर हा मूळ दर मानला जातो.

#### ११.१.२ हंगामानुसार दर:

रब्बी हंगामासाठी प्रवाही सिंचनासाठीचा घनमापन प्रशुल्काचा मूळ दर ठरवला जाईल. खरीप हंगामासाठी तो मूळ दराच्या ५०% व उन्हाळी हंगामासाठी तो १५०% असेल.

#### ११.१.३ सिंचनासाठीचा कालावधी:

जलप्रशुल्क आकारण्याच्या उद्देशाने कोकण व विदर्भ विभागासाठी आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी खरीप, रब्बी, उन्हाळी हंगामाचा कालावधी खालीलप्रमाणे असेल ;

**तक्ता क्र. १**
**सिंचन हंगामाचा कालावधी**

| हंगाम | कोकण व विदर्भ वळून उर्वरित महाराष्ट्रासाठी कालवधी | कोकण व विदर्भ विभागासाठी कालवधी |
|---|---|---|
| खरीप | १ जुलै ते १४ ऑक्टोबर | १ जुलै ते १४ नोव्हेंबर |
| रब्बी | १५ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारी | १५ नोव्हेंबर ते ३१ मार्च |
| उन्हाळी | १ मार्च ते ३० जून | १ एप्रिल ते ३० जून |

**११.१.४ लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थांसाठीचे दर:**

पाणी वापर संस्था स्थापन व्हायला प्रोत्साहन देण्यासाठी लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थांसाठी जलसिंचनाचे दर हे वैयक्तिक शेतक-यांच्या दराच्या पेक्षा २५% ने कमी असतील.

**११.१.५ उच्चस्तरीय पाणी वापर संस्थांसाठीचे दर:**

निम्न (लघुवितरिका) स्तरावरील पाणी वापर संस्थांसाठी कृषी पाण्याचा घनमापन दर हे वर दिल्याप्रमाणे ठरवले जातील. उच्च स्तरावरील पाणी वापर संस्थांसाठी म्हणजेच वितरिका स्तरावरील संस्था, कालवा स्तरावरील संस्था, प्रकल्प स्तरीय संस्थांसाठी हे दर महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार ठरवले जातील. त्यांना आकारण्यात येणारी पाणीपट्टी त्यांच्या अखत्यारीतील लघुवितरिका स्तरीय पाणी वापर संस्थांच्या एकूण पाणीपट्टीवर आधारित असेल.

**११.१.६ शासकीय उपसाचे दर:**

शासकीय उपसा सिंचन योजनांचे (उ.सि.यो.) दर हे प्रवाही सिंचन योजनांच्या दराएवढेच असतील.

**११.१.७ खाजगी उपसाचे दर:**

खाजगी उपसा सिंचन वापरकर्त्यांनी स्वत:च्या पायाभूत सुविधा, देखरेख व विद्युत शुल्क देयके असल्यामुळे त्यांच्यासाठीचे दर तक्ता क्र. २ मध्ये दिल्याप्रमाणे असतील.

**तक्ता क्र.२**

**मीटर बसविलेल्या खाजगी उपसा सिंचन योजनांचे स्रोतनिहाय अनुज्ञेय दर (वैयक्तिक वापरकर्ता)**

| अ. क्र. | वर्गवारी | पाणी पुरवठ्याच्या स्रोत | अनुज्ञेय दर |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | आश्वासित पाणी पुरवठा | मोठ्या प्रकल्पांचे जलाशय | मूळ दराच्या ८०% |
| २. | आश्वासित पाणी पुरवठा | मध्यम व लघु प्रकल्पांचे जलाशय, मोठ्या व मध्यम प्रकल्पांचे कालवे, साठवण तलाव | मूळ दराच्या ६५% |
| ३. | वहनव्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | धरणाच्या खालच्या बाजूचा नदीचा नियंत्रित भाग / उर्ध्व भागातील जलाशयाचा आधार | मूळ दराच्या ६५% |

| अ. क्र. | वर्गवारी | पाणी पुरवठ्याच्या स्त्रोत | अनुज्ञेय दर |
|---|---|---|---|
| | | असलेले को. प. बंधारे / जल विद्युत केंद्राचे अवजल / कालवा | |
| ४. | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | लघु प्रकल्पांचे कालवे, जलशयाचा आधार नसलेले को. प. बंधारे व कोणताही बंधारा नसलेला नदीचा अनियंत्रित भाग | मूळ दराच्या ३०% |
| ५. | पाणीवापरकर्त्या गटाने स्वखर्चाने बांधलेला व स्वखर्चाने व्यवस्थापन होत असलेले धरण/ बंधारा | वापरकर्त्या गटाने स्वखर्चाने बांधलेला व स्वखर्चाने व्यवस्थापन होत असलेले तलाव/ बंधारा | मूळ दराच्या १०% |

**११.१.८ पाण्याच्या मीटरसाठीचे दर:**

खाजगी उपसा जलसिंचन योजनेच्या लाभार्थ्यांनी पाण्याच्या वितरण पाईप लाईनच्या सुरुवातीला स्वखर्चाने पाण्याचा मीटर लावावा. हा मीटर जेव्हा खाजगी योजना ज्या वर्षात सुरु होते तेव्हा लावावा. जर मीटर लावला नाही, तर तक्ता दोन मध्ये दिलेल्या फायद्यांपैकी काही फायदे दिले जाणार नाहीत. आणि प्रत्येक लाभार्थ्यांना वैयक्तिक वापरकर्त्याच्या प्रवाही दरानुसार पाण्याचे दर आकारले जातील.

**११.१.९ नोंदणीकृत पाणी वापर संस्थांना दरात सवलत:**

खाजगी उसियों सहकारी कायदा १९६० अंतर्गत नोंदणीकृत पाणी वापर संस्था ज्या एकाच स्त्रोतातून पाणी उचलतात त्यांना तक्ता क्र. २ मध्ये नमूद दरामध्ये २५% अतिरिक्त सवलत देण्यात येईल.

**११.१.१० विकेंद्रीत पाणीसाठ्यासाठी दर:**

शासन निर्णय दि.०२.०५.२०१७ नुसार, ठोक पाणी पुरवठा गटाने विकेंद्रीत पाणीसाठ्यापर्यंत पाणी उपलब्ध करुन दिल्यास, संबंधित वहन व्यवस्थेच्या म्हणजेच प्रवाही किंवा उपसा अनुरुप वरील परिच्छेद ११.१ च्या उप-परिच्छेद (१), (४) आणि (६) मध्ये नमूद केल्यानुसार जल प्रशुल्क लागू राहील. जर लाभार्थ्यांने कालव्यातून बंदिस्त नलिकेद्वारे विकेंद्रित साठ्यापर्यंत नियंत्रित पाणी घेतल्यास, वहनव्यय आकारला जाणार नाही. मात्र नैसर्गिक प्रवाहाद्वारे विकेंद्रित

साठ्यापर्यंत नियंत्रित पाणी पुरवठा या स्त्रोतांपासून चारीने पाणी नेल्यास १०% वहन व्यय आकारले जाईल.

**११.१.११ मत्स्यशेतीकरिता दर**:

मत्स्य शेतीकरिता वैयक्तिक लाभधारकांसाठी सिचंनासाठीचे घनमापन दर अनुज्ञेय राहतील.

**११.१.१२ प्रकल्पग्रस्तांकरिता दर:**

ज्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना लाभ क्षेत्रात भरपाईसाठी पर्यायी जमिनी दिलेल्या आहेत. त्यांना अनुज्ञेय दराच्या ७५% दराने आकारणी करण्यात यावी. तसेच, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी स्वखर्चाने उपसा सिंचन राबवल्यास अनुज्ञेय दराच्या ५०% दराने आकारणी करावी.

**११.१.१३ हंगामासाठीचे दर:**

खरीप पिक लांबल्यामुळे रब्बीमध्ये पाणी घेतले अथवा रब्बी पिकांसाठी उन्हाळी हंगामात पाणी घेतले तर लांबलेल्या सिंचनाच्या आवर्तनासाठी तत्सम खरीप / रब्बी दराने आकारणी करावी.

**११.१.१४ चाचणीकरिता शुल्क नाही:**

जलसंपत्ती प्रकल्पावरील प्रथम वर्षाच्या सिंचनासाठी (चाचणी सिंचन) जल प्रशुल्काची आकारणी करू नये.

**११.१.१५ आधुनिक पद्धतीने (सूक्ष्म सिंचन) सिंचनासाठी दर** :

वैयक्तिक शेतकऱ्यांनी आधुनिक पध्दतीचा (सूक्ष्म सिंचन) अवलंब करून जलमापक यंत्राद्वारे घनमापन पद्धतीने पाणी घेतले तर त्यांना अनुज्ञेय दराच्या ७५ % दराने आकारणी करावी. नोंदणीकृत पाणी वापर संस्थांनी घनमापन पद्धतीने पाणी मोजून घेऊन **किमान ७५% पाणीवापर संस्थांनी** सूक्ष्म सिंचन केल्यास नोंदणीकृत पाणी वापर संस्थेसाठी प्रवाही सिंचनासाठी अनुज्ञेय केलेल्या दराच्या ७५% दराने आकारणी करावी.

**११.१.१६ अग्रिम प्रदानासाठी सवलत** :

हंगाम सुरु होण्यापूर्वी त्या हंगामाच्या जल प्रशुल्काची पूर्ण आगाऊ अदायगी केली असेल तर त्या हंगामासाठी अनुज्ञेय दरामध्ये १०% सवलत दिली जाईल.

**११.१.१७ जल शुल्काच्या प्रदानात दिरंगाई झाल्यास दंड :**

ठोक जलपुरवठा गटाने (BWSE) ठोक पाणी वापरकर्त्यास (BWUE) देयक पाठविल्यानंतर देयकात नमूद विहित कालावधी मागणी केल्यानुसार जलप्रशुल्क अदा न केल्यास वार्षिक १०% दराने दंडात्मक व्याज आकारावे.

**११.१.१८ माजी मालगुजारी तलावांच्या पाणी वापराचे दर:**

माजी मालगुजारी तलावांच्या पाणीवापराचे दर सर्वोच्च न्यायालयाच्या केस क्र. सिव्हील अपील क्र. २४७५ (१९६८) दि. १६.०८.१९७८ च्या निर्णयानुसार राहतील.

**११.१.१९ झिरपणा-या/गळतीच्या पाणीवापराचे दर** :

महाराष्ट्र सिंचन यंत्रणा शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या तरतुदींचे पालन केले जात नाही तेथे म्हणजे जेथे फक्त वैयक्तिक पाणी पुरवठा केला जातो, तेथे महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ च्या कलम ५५ (क) ची तरतूद लागू होते.

*कलम ५५ (क)- जलसिंचनासाठी कालव्याच्या पाण्याचा प्रत्यक्ष पुरवठा केला असता जितका फायदा झाला असता तितका फायदा एखाद्या कालव्यातून पाणी पाझरल्यामुळे किंवा पाण्याची गळती झाल्यामुळे मिळत असेल किंवा पृष्ठभागावरील वाहत्या पाण्यामुळे प्राप्त होत असेल अशा लागवडीखालील कोणत्याही जमिनीवर, किंवा*

*कलम ५५ (ख) - कालव्याच्या कोणत्याही बाजूला कालव्याच्या निकटतम हद्दीपासून ३५ मीटर अंतराच्या आत असलेल्या विहिरीच्या सहाय्याने जलसिंचन होत असेल अशा लागवडीखालील कोणत्याही जमिनीवर खंड (क) खाली येणाऱ्या लागवडीखालील जमिनीच्याबाबतीत पिकासाठी किंवा ज्यामध्ये कालव्यात पाणी सोडण्यात येते अशा हंगामासाठी याच प्रकारचा प्रत्यक्ष पाणीपुरवठा करण्याकरिता सामान्यत: जी पाणीपट्टी आकारण्यात आली असती, त्या पाणीपट्टीहून अधिक नसेल इतकी पाणीपट्टी आकारण्यात येईल आणि खंड (ख) खाली येणाऱ्या लागवडीखालील जमिनीच्याबाबत समुचित प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे, अशा पट्टीच्या निम्याहून अधिक नसेल इतकी पाणीपट्टी आकारण्यात येईल.*

स्पष्टीकरण :- या कलमाच्या प्रयोजनार्थ, या कलमान्वये आकारणी करण्यात आलेली जमीन ही कालव्यापासून जलसिंचन होणारी जमीन असल्याचे मानण्यात येईल.

**११.१.२०. वापर प्रवर्गात बदल झाल्यास दंडात्मक शुल्क आकारणी:**

ठोक पाणी वापर गटाने कृषी पाणी हक्कातून पूर्वपरवानगीशिवाय औद्योगिक किंवा व्यावसायिक प्रवर्गासाठी पाणीपुरवठा करत असल्याचे आढळल्यास, अशा पाणी वापरासाठी लागू असलेल्या उक्त पाण्याच्या शुल्काच्या दुप्पट शुल्क पूर्वलक्षी प्रभावाने आकारले जाईल.

<u>११.२ घरगुती :</u>

**११.२.१ घरगुती जलवापरासाठी मूळ दर :**

घरगुती जलवापरासाठी मूळ दर हा २२% प्रचालन व परिरक्षण खर्चावर आधारित असेल. इतर घटक खालील प्रमाणे-

**११.२.२ सर्व हंगामासाठी एकच दर :**

मूळ घनमापन दर हा सर्व हंगामासाठी एकच असेल, व तो पुरवठाच्या स्त्रोताशी निगडित असेल.

**११.२.३ महानगरपालिका, स्थानिक स्वराज्यसंस्था व ग्रामपंचायतींसाठी दर :**

अनुज्ञेय दर महानगरपालिकांना मूळ दराच्या १२५%, इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मूळ दराच्या ९०% आणि ग्रामपंचायतींना मूळ दराच्या ७५% असेल.

**११.२.४ स्त्रोतनिहाय दर आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे विसर्ग (outlet) मानक:**

मूळ दर (BR) हे, खाली दिलेल्या तक्ता क्र. ३ मधील स्त्रोतनिहाय वर्गीकरणावर आधारित असतील आणि त्याबरोबरच नैसर्गिक प्रवाहात अथवा कालव्यात सोडण्यापूर्वी सांडपाण्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विहीत गुणवत्ते साठी शुध्दिकरण प्रक्रिया करण्याच्या अटीच्या अधिन राहील.

पाणी पुरवठ्याचा स्त्रोत निहाय अनुज्ञेय दर खालीलप्रमाणे;

**तक्ता क्र.३**

**घरगुती पाणी वापराचे स्त्रोतनिहाय अनुज्ञेय दर**

| अ.क्र. | वर्गवारी | पाणी पुरवठ्याच्या स्त्रोत | दर |
|---|---|---|---|
| अ) | आश्वासित पाणी पुरवठा | जलाशय / कालवा नसलेले साठवण तलाव | अनुज्ञेय दर |
| ब) | वहनव्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | धरणाच्या खालील बाजूचा नदीचा नियंत्रित भाग/जलाशयाचा आधार असलेला को. प. बंधारा/जल विद्युत केंद्रातील अवजल /कालवा | अनुज्ञेय दराच्या २.० पट |
| क) | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | जलाशयाचा आधार नसलेला को. प. बंधारा /को. प. बंधारा किंवा कोणताही बंधारा नसलेली अनियंत्रित नदी | अनुज्ञेय दराच्या ५०% |
| ड) | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल | पाणी वापरकर्ता गट (ग्रामपंचायत/ नगरपालिका/महानगरपालिका व तत्सम इतर संस्था) यांनी धरण / बंधारा / को. प. बंधारा याचा प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल. | खालील टीप पहावी. |
| इ) | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल. तसेच पाणी वापरकर्त्या गटाने पायाभूत सुविधा निर्माण केली आणि त्याची देखभाल केली असेल. | पाणी वापरकर्ता गट (ग्रामपंचायत/ नगरपालिका/महानगरपालिका व तत्सम इतर संस्था) यांनी धरण/बंधारा/को. प. बंधारा स्वखर्चाने बांधला असेल. | अनुज्ञेय दराच्या १६% |

टिप : जुन्या करारासाठी पायाभूत सुविधांचा पूर्ण / प्रमाणशीर खर्च उचलण्याबाबत किंवा नविन प्रकल्पाच्या नियोजनाच्या टप्प्यात पायाभूत सुविधांचा खर्च उचलण्याबाबत सहमती झाल्यानुसार किंवा पाणी वापर गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी वापरासाठी त्याच्या वार्षिक मागणी एवढ्या क्षमतेच्या बंधारा / बांध बांधला असल्यास, अदा केलेल्या खर्चाच्या प्रमाणात जल प्रशुल्क अनुज्ञेय दराच्या १६% लागू असेल. अशा

पाणी वापर गटाने पाणी वाटपाच्या प्रमाणशीर खर्चापैकी दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ जल प्रशुल्क समजण्यात येईल आणि ते अनुज्ञेय दराच्या १६% सवलतीच्या जल प्रशुल्काच्या तुलनेत समायोजित केले जातील. सवलतीचे दर किती वर्षांसाठी लागू असेल याची गणना १०% व्याजासह निव्वळ वर्तमान किंमत (Net Present Value, NPV) पद्धतीने काढण्यात येईल. आगाऊ प्रशुल्काचे पूर्ण समायोजन केल्यावर संबंधित अनुज्ञेय पूर्ण दर लागू होतील.

### ११.२.५ शहरी स्थानिक स्वराज्य संस्था) ULBs) यांच्यासाठी पाणी आकारणी :

शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी) ULBs) जलसंपदा विभाग) WRD) / सिंचन विकास महामंडळ (IDC) यांना पाणी वाटपाबाबत करार / हक्कप्राप्ती / कोटा किंवा प्रत्यक्ष पाणी वापर, यांपैकी जो जास्त असेल त्यानुसार, प्रत्येक वापर प्रवर्गनिहाय लागू दराने पाणी आकारणी अदा करणे बंधनकारक राहील.

उदाहरण:
जर एखाद्या महानगरपालिकेस खालीलप्रमाणे पाणी वाटप मान्य असेल:
·घरगुती - ७५%
· व्यापारी - १५ %
· औद्योगिक - १०%

परंतु प्रत्यक्ष वापर खालीलप्रमाणे असेल:
· घरगुती - ७५%
· व्यापारी - २०%
· औद्योगिक - ५%

तर आकारणी पुढीलप्रमाणे करण्यात येईल:
· घरगुती : ७५ %@ लागू घरगुती दराने
· व्यापारी : २० %@ लागू व्यापारी दराने
· औद्योगिक : १० %@ लागू औद्योगिक दराने) प्रत्यक्ष वापरापेक्षा जास्त असल्याने(

ही पद्धत वापर प्रवर्गनिहाय मंजूर हक्कांचे पालन सुनिश्चित करते, पाण्याचा अपवापर/चुकीचे वर्गीकरण टाळते तसेच पाणी वापराचे कार्यक्षम निरीक्षण व नियमन करण्यास सहाय्य करते.

महानगरपालिकेकडून घरगुती, व्यापारी व औद्योगिक वापरासाठी पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचा प्रवर्गनिहाय तपशील आकारणी व पडताळणीसाठी सहाय्यक दस्तऐवज म्हणून जलसंपदा विभाग /सिंचन विकास महामंडळ यांच्याकडून वापरण्यात येईल.

नगर परिषद / नगर पंचायत / ग्राम पंचायत यांच्याबाबत तरतूद:

नगर परिषदांच्या बाबतीत व्यापारी उद्देशासाठी होणारा एकूण पाणी वापर, तसेच नगर पंचायत व ग्राम पंचायत यांच्या बाबतीत दररोज १० घनमीटर किंवा त्यापेक्षा जास्त पाणी वापरणाऱ्या कोणत्याही व्यापारी घटकास, घरगुती वापरातील "व्यापारी "उप-प्रवर्गामध्ये वर्गीकृत करण्यात येईल.

अशा घटकांकडून आकारणी घरगुती दराच्या लागू दराच्या पाच) ५ (पट नगर परिषद / नगर पंचायत / ग्राम पंचायत यांच्यासाठी निर्धारित दराने करण्यात येईल.

**११.२.६ महाराष्ट्र विभागीय आणि नागरी योजना अधिनियमाखाली नागरी वसाहतीसाठी दर:**

एकात्मिक नागरी वसाहत प्रकल्प म्हणजे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (MRTP Act) मधील कलम १८ किंवा ४४ नुसार घोषित एकात्मिक नागरी वसाहत ज्यासाठी ठोक पाणी पुरवठादाराकडून थेट पाणी पुरवठा केला जातो, त्याकरिता महानगरपालिकांसाठी निर्धारित केलेल्या स्त्रोतनिहाय अनुज्ञेय दराप्रमाणे दर आकारण्यात येईल.

**११.२.७ खाजगी गृहसंकुलांना बांधकाम चालू असताना पाणी पुरवठा केल्यावर आकारले जाणारे शुल्क** :

व्यापारी संस्था, खाजगी वसाहती, नागरी वसाहती यांच्या बांधकामासाठी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रातून प्रक्रिया केलेले पाणी वापरले जाईल. जर नैसर्गिक पाणी (फ्रेश वॉटर) वापरले तर वाणिज्यिक दराच्या दोन पटीने शुल्क आकारले जाईल. बांधकामासाठी प्राधान्याने सांडपाणी प्रक्रिया संयंत्रातून (STP) प्रक्रिया केलेले पाणी वापरले जावे.

**११.२.८ जल सिंचनाच्या अधिपत्याखालील क्षेत्रामधील विहिरींकरिता दर** :

जर ठोक पाणी वापर गटाने त्यांच्या कालव्याच्या जलसिंचन अधिपत्याखालील क्षेत्रातील विहिरीवर अवलंबून राहिल्यास (कालव्याची व्याख्या महाराष्ट्र जल सिंचन अधिनियम, १९७६ च्या कलम २(३) प्रमाणे असेल) त्यांना महाराष्ट्र जल सिंचन अधिनियम, १९७६ च्या कलम ५६

मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मूळ दराच्या ५०% दराने जल शुल्क आकारले जाईल. ही तरतूद खालीलप्रमाणे आहे:-

*“ कलम ५६(१) - ज्यास एखाद्या कालव्यातून पाझरलेले पाणी मिळत असेल असा कोणताही नैसर्गिक ओढा किंवा कृत्रिम नाली यातून जलसिंचनाच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनांसाठी वापरल्या जाणा-या पाण्यावर अशा प्रयोजनांसाठी कालव्यामधून पाणीपुरवठा केला असता तर सामान्यत: जी पाणीपट्टी आकारण्यात आली असती त्या पाणीपट्टीपेक्षा अधिक नसेल इतकी पाणीपट्टी आकारण्यात येईल; आणि कालव्याच्या कोणत्याही बाजूस कालव्याच्या निकटतम हद्दीपासून ३५ मीटर अंतराच्या आत असलेल्या विहिरीतून अशा प्रयोजनांसाठी वापरल्या जाणा-या पाण्यावर, समुचित प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे, अशा पट्टीच्या निम्म्याहून अधिक नसेल इतकी पाणीपट्टी आकारण्यात येईल.*

*कलम ५६(२) - पोट कलम (१) च्या तरतुदी कोणत्याही गावाच्या रहिवाशांनी केवळ घरगुती प्रयोजनांसाठी वापर केलेल्या अशा प्रवाहातील, नालीतील किंवा विहिरीतील पाण्यास लागू होणार नाही.”*

### ११.२.९ अतिरिक्त वापरासाठीचा दंड :

पाण्याची हक्कदारी (Entitlement) अथवा मंजूर पाणी कोटा हा सप्टेंबर, २०१७ च्या निकषातील परिच्छेद ६.१ नुसार ठरवला जाईल. मंजूर पाणी कोट्याच्या १००% पर्यंत वार्षिक पाणी वापराकरिता अनुज्ञेय दर आकारण्यात यावा. १००% ते १२५% पाणी वापराकरिता अनुज्ञेय दराच्या दीड पट दर आणि १.२५% पेक्षा जास्त वापरास अनुज्ञेय दराच्या तीन पट दर असतील.

### ११.२.१० सांडपाण्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषानुसार प्रक्रिया केली नसल्यास दंडात्मक शुल्क :

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाणी नैसर्गिक प्रवाहामध्ये अथवा कालव्यात सोडण्यापूर्वी त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणित मानकांनुसार प्रक्रिया करणे गरजेचे आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या पाणी वाटपाच्या आधारावर सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (STP) स्थापित केली नसल्यास आणि / अथवा ती पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्यास, व प्रक्रिया केलेले पाणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषानुसार नसल्यास, मंजूर पाणी कोटा अथवा प्रत्यक्ष पाणी वापर यापैकी जे अधिक असेल त्यास अनुज्ञेय दराच्या तीन पट दराने आकारणी केली जाईल. गुणवत्ता नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वैध संमती

व प्रयोगशाळा अहवाल हा ठोक पाणी वापर गटाने वापरकर्त्यांनी ठोक पाणीपुरवठा गटास उपलब्ध करून दिले जाईल व त्या आधारावर मागील कालावधीसाठी दंड आकारला जाईल. जर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रयोगशाळा अहवाल (तीन महिन्यापेक्षा जुना नसावा) उपलब्ध नसेल तर पाणी गुणवत्ता निश्चित करण्यासाठी आणि आवश्यक कारवाई करण्यासाठी परिच्छेद २.१३ मध्ये नमूद केलेला प्रयोगशाळा अहवाल विचारात घेतला जाईल. सांडपाणी प्रक्रिया केंद्राची माहिती पाणी मागणीपत्रात द्यावी आणि करारामध्ये अंतर्भूत करावी.

**११.२.११ करार न करता पाणी वापरल्यास दंड:**

करारनामा न करता पाणी वापरल्यास अनुज्ञेय दराच्या दोन पट दराने आकारणी करावी. (तक्ता क्र. ३ च्या अनुज्ञेय दराप्रमाणे)

**११.२.१२ पाण्याच्या वापराचा हेतू बदलल्यास दंड:**

ठोक पाणी पुरवठा गटाची पूर्वपरवानगी न घेता नागरी स्थानिक स्वराज्य संस्था पिण्याच्या पाण्याचे पाणी हक्कदारीतून औद्योगिक/व्यापारी वापरकर्त्यास पाणी पुरवठा करत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा पाणी वापरासाठी अनुज्ञेय औद्योगिक/व्यापारी दराच्या २.० पट दराने पूर्वलक्षी प्रभावाने आकारणी करावी.

**११.२.१३ पाण्याचे मीटर बसवले नसतील तर दंड:**

जेथे पाण्याचे मीटर बसवले नसतील तेथे पाण्याचे शुल्क अनुज्ञेय दराच्या २.० पट असेल. तक्ता क्र. ३ च्या अनुज्ञेय दराप्रमाणे)

**११.२.१४ पाण्याचा मीटर काम करीत नसल्यास दंड :**

मीटर चालू नसल्यास/काढून ठेवले असल्यास/छेडछाड केली असल्यास/चुकीचे रिडींग दाखवत असल्याचे आढळून आल्यास मीटर दुरुस्त करण्यासाठी आणि चालू करण्यासाठी एक महिन्याची नोटीस दिली जाईल. जलमापक यंत्र ६० दिवसांमध्ये दुरुस्त करावे. या कालावधीतील मंजूर पाणी आरक्षण अथवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे जादा असेल त्या परिमाणास अनुज्ञेय दराने आकारणी करावी. विशिष्ट स्थानिक परिस्थिती विचारात घेवून मीटर दुरुस्ती कालावधीस एक महिन्याची मुदत वाढ देता येईल. तथापि जलमापक यंत्र दुरुस्तीसाठी विहीत केलेल्या कालावधीत जलमापक यंत्र दुरुस्त करुन पूर्ववत न केल्यास दंडनीय दराने म्हणजेच अनुज्ञेय दराच्या २ पट दराने आकारणी करण्यात यावी.

**११.२.१५ विलंबाने झालेल्या प्रदानाबाबत दंड :**

ठोक जलपुरवठा गटाने (BWSE) ठोक पाणी वापरकर्त्यास (BWUE) देयक पाठविल्यानंतर देयकात नमूद विहित कालावधीत मागणी केल्यानुसार जलप्रशुल्क अदा न केल्यास वार्षिक १०% दराने दंडात्मक व्याज आकारावे.

**११.३ औद्योगिक:**

**११.३.१ पाण्याच्या औद्योगिक वापरासाठी मूळ दर:**

पाण्याच्या औद्योगिक वापरासाठी मूळ दर हा प्रचालन व परिरक्षण खर्चाच्या ५९% वर आधारित असेल. व इतर घटक खालील प्रमाणे :-

**११.३.२ सर्व हंगामासाठी एकच दर :**

मूळ घनमापन दर हा सर्व हंगामासाठी एकच असेल, व तो पुरवठाच्या स्त्रोताशी निगडित असेल.

**११.३.३ स्त्रोतनिहाय दर आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे विसर्ग (outlet) मानक:**

मूळ दर (BR) हे, खाली दिलेल्या तक्ता क्र. ४ मधील स्त्रोतनिहाय वर्गीकरणावर आधारित असतील आणि त्याबरोबरच नैसर्गिक प्रवाहात अथवा कालव्यात सोडण्यापूर्वी सांडपाण्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विहीत गुणवत्ते साठी शुध्दिकरण प्रक्रिया करण्याच्या अटीच्या अधिन राहील.

**११.३.४ उद्योगासाठी दर :**

उद्योगांसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे प्रकार प्रशासकीय कार्यक्षमता, पाण्याच्या प्रभावी वापर आणि संवर्धन यासाठी कोणत्याही उद्योगाला औद्योगिक किंवा व्यावसायिक हेतूसाठी होणारा पाणीपुरवठा, त्याच्या अंतिम वापर प्रक्रिया निवेशासाठी असो वा निष्पत्तीसाठी, उद्योगाच्या श्रेणीनुसार वर्गीकृत केला जाईल. उद्योगाला होणारा संपूर्ण पाणीपुरवठा एकच एकक मानला जाईल आणि खाली तपशीलवार वर्णन केल्याप्रमाणे प्रक्रिया किंवा अंतिम वापराच्या आधारावर त्याचे विभाजन केले जाणार नाही.

१. **“अ” प्रवर्गातील उद्योग**

खालील प्रवर्ग "ब" अंतर्गत नमूद केलेल्या उद्योगाव्यतिरिक्त इतर उद्योगांचे वर्गीकरण प्रवर्ग "अ" मध्ये केले जाईल आणि लागू असलेल्या अनुसूचीनुसार पुरवठ्याच्या **स्रोताशी** निगडित दराने शुल्क आकारले जाईल.

२. **"ब" प्रवर्गातील उद्योग**

मिनरल वॉटर, बंद बाटली पिण्याचे पाणी, पेय उद्योग (मद्ययुक्त आणि मद्यविरहित), शीतपेये, मद्य व इथेनॉल निर्मिती, बिअर बनविणारे कारखाने (ब्रुअरीज), मद्य आसवानी केंद्रे (डिस्टिलरीज), द्राक्षारस निर्मिती केंद्रे (वायनरीज) यासारख्या उत्पादनांचे उत्पादन करणारे उद्योग तसेच तत्सम प्रकारचे उद्योग प्रवर्ग ब मध्ये वर्गीकृत केले जातील. प्रवर्ग "ब" साठी लागू दर हा प्रवर्ग "अ" साठी विहित केलेल्या दराच्या दहापट असेल. आणि याशिवाय, जैवइंधन म्हणून इथेनॉलच्या उत्पादनासाठी डिस्टिलरी द्वारे वापरण्यात येणारे पाणी प्रवर्ग "अ" उद्योग म्हणून गणले जाईल आणि त्यावर प्रवर्ग "अ" दराने शुल्क आकारले जाईल. तथापि जैवइंधनाव्यतिरिक्त इथेनॉलच्या उत्पादनासाठी वापरण्यात येणारे पाणी प्रवर्ग ब उद्योग म्हणून गणले जाईल आणि त्यानुसार त्यावर प्रवर्ग ब अंतर्गत शुल्क आकारले जाईल.

एकाच कारखान्यांमध्ये "अ" आणि "ब" प्रवर्गाचे उद्योग असल्यास आवश्यक मंजुरी व करारनाम्यातील तरतुदीनुसार स्वतंत्र पायाभूत सुविधा उभारावी आणि स्वतंत्र मीटर बसवावे लागतील.

३. औद्योगिक प्रवर्गातील परिच्छेद ७ मध्ये नमूद केल्यानुसार घरगुती वापरासाठी पुरवठ्याच्या स्रोतानुसार महापालिकाच्या मूळ दराने शुल्क आकारले जाईल.

**तक्ता क्र. ४**

**औद्योगिक पाणी वापराचे स्रोतनिहाय अनुज्ञेय दर**

| अ.क्र. | वर्गवारी | पाणी पुरवठ्याच्या स्रोत | अनुज्ञेय दर |
|---|---|---|---|
| अ) | आश्वासित पाणी पुरवठा | जलाशय / कालवा नसलेले साठवण तलाव | मूळ दर |
| ब) | वहनव्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | धरणाच्या खालील बाजूचा नदीचा नियंत्रित भाग / जलाशयाचा आधार असलेला को. प. बंधारा / जल विद्युत केंद्रातील अवजल | मूळ दराच्या २.० पट |

| अ.क्र. | वर्गवारी | पाणी पुरवठ्याच्या स्रोत | अनुज्ञेय दर |
|---|---|---|---|
| क) | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | जलाशयाचा आधार नसलेला को. प. बंधारा / को. प. बंधारा किंवा कोणताही बंधारा नसलेली अनियंत्रित नदी | मूळ दराच्या ५०% |
| ड) | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल. तसेच पाणी वापरकर्त्या गटाने पायाभूत सुविधा निर्माण केली आणि त्याची देखभाल केली असेल. | वापरकर्ता गट (पाणी प्रक्रियेसाठी वापरणारा उद्योग किंवा पाणी कच्चा माल म्हणून वापरणारा उद्योग) यांनी धरण / बंधारा / को.प.बंधारा याचा प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल. | खालील टीप पहावी. |

जुन्या करारासाठी पायाभूत सुविधांचा पूर्ण / प्रमाणशीर खर्च उचलण्याबाबत किंवा नविन प्रकल्पाच्या नियोजनाच्या टप्प्यात पायाभूत सुविधांचा खर्च उचलण्याबाबत सहमती झाल्यानुसार किंवा पाणी वापर गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी वापरासाठी त्याच्या वार्षिक मागणी एवढ्या क्षमतेच्या बंधारा / बांध बांधला असल्यास, अदा केलेल्या खर्चाच्या प्रमाणात जल प्रशुल्क अनुज्ञेय दराच्या १६% लागू असेल. अशा पाणी वापर गटाने पाणी वाटपाच्या प्रमाणशीर खर्चापैकी दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ जल प्रशुल्क समजण्यात येईल आणि ते अनुज्ञेय दराच्या १६% सवलतीच्या जलप्रशुल्काच्या तुलनेत समायोजित केले जातील. सवलतीचे दर किती वर्षांसाठी लागू असेल याची गणना १०% व्याजासह (Net Present Value, NPV) पद्धतीने काढण्यात येईल. आगाऊ प्रशुल्काचे पूर्ण समायोजन केल्यावर संबंधित अनुज्ञेय पूर्ण दर लागू होतील.

### ११.३.५ औद्योगिक प्रवर्गामध्ये घरगुती वापरासाठीचे दर :

उद्योगांबरोबर करार करताना “औद्योगिक युनिट्समध्ये घरगुती वापर” याची गणना करुन त्याला नगरपालिकेला अनुज्ञेय दराने शुल्क आकारले जाईल. ठोक प्रमाणात पाणी पुरवठा करणारी संस्था (BWSE) अशा जल गणनेला मान्यता देईल व संबंधित पायाभूत सुविधांची पूर्तता व स्वतंत्र वॉटर मीटर्स बसवल्यानंतर करारात समाविष्ट केल्याप्रमाणे दर लागू होतील.

**११.३.६ जलसिंचनाच्या अधिपत्याखालील क्षेत्रामधील विहिरींकरिता दर :**

ज्या ठोक पाणी वापर करते गटाकडून कालव्याच्या लाभक्षेत्रातील ( कालवा म्हणजे महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ च्या कलम ३(१) मधे व्याख्या केल्यानुसार) विहिरींवर अवलंबून असतील त्यांना महाराष्ट्र टक्के दराने पाटबंधारे अधिनियम, १९७६ च्या कलम ५६(१) मध्ये प्रावधान केल्याप्रमाणे अनुज्ञेय दराच्या ५०% दराने जल शुल्क आकारले जाईल.

*" कलम ५६(१) - ज्यास एखाद्या कालव्यातून पाझरलेले पाणी मिळत असेल असा कोणताही नैसर्गिक ओढा किंवा कृत्रिम नाली यातून जलसिंचनाच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनांसाठी वापरल्या जाणा-या पाण्यावर अशा प्रयोजनांसाठी कालव्यामधून पाणीपुरवठा केला असता तर सामान्यत: जी पाणीपट्टी आकारण्यात आली असती त्या पाणीपट्टीपेक्षा अधिक नसेल इतकी पाणीपट्टी आकारण्यात येईल; आणि कालव्याच्या कोणत्याही बाजूस कालव्याच्या निकटतम हद्दीपासून ३५ मीटर अंतराच्या आत असलेल्या विहिरीतून अशा प्रयोजनांसाठी वापरल्या जाणा-या पाण्यावर, समुचित प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे, अशा पट्टीच्या निम्म्याहून अधिक नसेल इतकी पाणीपट्टी आकारण्यात येईल."*

**११.३.७ अतिरिक्त वापरासाठी दंडात्मक शुल्क:**

पाण्याचा हक्कदारी (Entitlement) अथवा मंजूर पाणी कोटा हा (परिच्छेद ७.१ नुसार) सप्टेंबर, २०१७ च्या निकषानुसार ठरवला जाईल. मंजूर पाणी कोट्याच्या १००% पर्यंत वार्षिक पाणी वापराकरिता अनुज्ञेय दर आकारण्यात यावा. १००% ते १२५% पाणी वापराकरिता अनुज्ञेय दराच्या दीड पट दर आणि १२५% पेक्षा जास्त वापरास अनुज्ञेय दराच्या तीन पट दर असतील.

**११.३.८ कृषी उद्योगासाठी दर :**

"कृषी उद्योग" जसे साखर उद्योग व त्यासोबतचा सहऊर्जा निर्मिती प्रकल्प, अन्नधान्य व फळ प्रक्रिया, कुक्कुटपालन, भात गिरणी, दुग्ध व्यवसाय, वनस्पतीजन्य तेल आणि तुप इ. साठी अनुज्ञेय दराच्या ७५% दराने आकारणी करावी. मात्र ऊस, मका किंवा तत्सम धान्य किंवा फळांपासून मद्य व इथेनॉल निर्मिती, वाइन तयार करणारी केंद्रे (वायनरी), बिअर तयार करणारे कारखाने (ब्रुअरीज), आसवानी,सुगंधी द्रव्ये इत्यादी निर्मितीसाठी ही सवलत अनुज्ञेय असणार नाही. वरील व्यतिरिक्त, केवळ जैवइंधन इथेनॉलचे उत्पादन करणाऱ्या सर्व धान्य आधारित आसवानी प्रकल्प प्रवर्ग "अ" उद्योगाचे दर लागू होतील.

**११.३.९ सांडपाण्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषानुसार प्रक्रिया केली नसल्यास दंडात्मक शुल्क :**

औद्योगिक संस्थांनी सांडपाणी नैसर्गिक प्रवाहामध्ये अथवा कालव्यात सोडण्यापूर्वी त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणित मानकांनुसार प्रक्रिया करणे गरजेचे आहे. औद्योगिक संस्थांनी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (ETP) स्थापित केलेली नसल्यास अथवा ती पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्यास, अथवा प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची गुणवत्ता म.प्र.नि.मं. च्या निकषानुसार नसल्यास मंजूर पाणी कोटा अथवा प्रत्यक्ष पाणी वापर यापैकी जे अधिक असेल त्यास अनुज्ञेय दराच्या तीन पट दराने आकारणी केली जाईल. गुणवत्ता नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वैध संमती व पाणी गुणवत्ता प्रमाणपत्र हा ठोक पाणी वापर गटाने वापरकर्त्यांनी ठोक पाणीपुरवठा गटास उपलब्ध करून दिले जाईल व त्या आधारावर मागील कालावधीसाठी दंड आकारला जाईल. जर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रयोगशाळा अहवाल तीन महिन्यापेक्षा जुना नसावा उपलब्ध नसेल तर पाणी गुणवत्ता निश्चित करण्यासाठी आणि आवश्यक कारवाई करण्यासाठी परिच्छेद २.१३ मध्ये नमूद केलेला **पाणी गुणवत्ता प्रमाणपत्र** विचारात घेतला जाईल. मंजूर केलेल्या पाणी कोट्यातून निर्माण झालेले औद्योगिक सांडपाणी करारात नमूद करावे. जर ते सुधारित केले तर पुरवणी करारात नमूद करावे.

**११.३.१० पुर्नप्रक्रिया व पुनर्वापराचे दर :**

जर एखाद्या उद्योगाने आपली पाण्याची मागणी पुनर्प्रक्रिया करुन कमी केली (त्यांची पाण्याची निव्वळ मागणी ७५% किंवा त्यापेक्षा कमी केली तर) त्यांना लागू असलेल्या दराच्या ७५% दर आकारले जातील. मात्र याबाबतची खातरजमा कार्यकारी अभियंता यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याने करुन तसे लेखी प्रमाणित करणे आवश्यक आहे. पुनर्वापरामुळे मागणी ५०% कमी झाल्यास, त्यांना अनुज्ञेय दराच्या ५० टक्के दराने शुल्क आकारले जाईल.

**११.३.११ शून्य द्रव विसर्गासाठी दर:**

उद्योगांनी शून्य द्रव विसर्ग ZLD (Zero Liquid Discharge) तंत्रज्ञानाचा अवलंब केला आणि त्यांच्या पाणी वितरण प्रणाली मधील व्यय, बाष्पीभवन आणि प्रक्रियेतील वापर यासाठी वाटपाच्या २५% पर्यंत पाणी वापर केला तर त्या पाणी वापरास अनुज्ञेय दराच्या फक्त २५% जल प्रशुल्क आकारले जाईल. तथापी, सदर उद्योग वार्षिक मंजूर पाणी मागणी किमान ७५% च्या मर्यादेपर्यंत वा त्यापेक्षा कमी करीत असेल तरच सदर सवलत अनुज्ञेय राहील.

याबाबतची खातरजमा कार्यकारी अभियंता यांचेपेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याने करुन तसे लेखी प्रमाणित करणे अनिवार्य राहील.

**११.३.१२ करार न करता पाणी वापरल्यास दंड :**

करारनामा न करता पाणी वापरल्यास अनुज्ञेय दराच्या दोन पट दराने आकारणी करावी.

**११.३.१३ पाण्याचे मीटर बसवले नसतील तर दंड :**

जेथे पाण्याचे मीटर बसवले नसतील तेथे पाण्याचे शुल्क अनुज्ञेय दराच्या दोन पट असेल.

**११.३.१४ पाण्याचा मीटर काम करीत नसल्यास दंड :**

मीटर चालू नसल्यास / काढून ठेवले असल्यास / छेडछाड केली असल्यास / चुकीचे मोजमाप दाखवत असल्याचे आढळून आल्यास मीटर दुरुस्त करण्यासाठी आणि चालू करण्यासाठी एक महिन्याची नोटीस दिली जाईल. या कालावधीतील मंजूर पाणी आरक्षण अथवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे जादा असेल त्या परिमाणास अनुज्ञेय दराने आकारणी करावी. विशिष्ट स्थानिक परिस्थिती विचारात घेवून मीटर दुरुस्ती कालावधीस एक महिन्याची मुदत वाढ देता येईल. तथापि जलमापक यंत्र दुरुस्तीसाठी विहीत केलेल्या कालावधीत जलमापक यंत्र दुरुस्त करुन पूर्ववत न केल्यास दंडनीय दराने म्हणजेच अनुज्ञेय दराच्या दोन पट दराने आकारणी करण्यात यावी.

**११.३.१५ विलंबाने झालेल्या प्रदानाबाबत दंड :**

ठोक जलपुरवठा गटाने (BWSE) ठोक पाणी वापरकर्त्यास (BWUE) देयक पाठविल्यानंतर देयकात नमूद विहित कालावधीत मागणी केल्यानुसार जलप्रशुल्क अदा न केल्यास वार्षिक १०% दराने दंडात्मक व्याज आकारावे.

**११.३.१६ हरित हायड्रोजन प्रकल्पाचा दर :**

उद्योग व ऊर्जा विभागाच्या शासन निर्णय दि. १७.१०.२०२३ नुसार व जलसंपदा विभागाच्या संकीर्ण- २०२४/ पत्र क्र. १६१/२४ सिंव्य(धोरण) दि. १७.०४.२०२६ नुसार, पाणीपुरवठा किंवा हरित हायड्रोजन प्रकल्पासाठी (नूतनीकरणक्षम ऊर्जा स्रोताद्वारे इलेक्ट्रोलायसिससाठी) प्रवर्ग “अ” उद्योगांना लागू असलेल्या दराच्या ५० टक्के दराने शुल्क आकारले जाईल. हा सवलतीचा दर प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून तीन वर्षासाठी लागू राहील.

**११.३.१७ उदंचन योजना प्रकल्पाचे दर :**

जलसंपदा विभागचे पत्र क्र. संकीर्ण/२०२४/प्र.क्र.१६१/२४/सिंव्य(धोरण) दि. १४.०४.२०२६ नुसार उदंचन प्रकल्पासाठी पुरवलेले पाणी औद्योगिक दरातील प्रवर्ग “अ”प्रमाणे आकारले जातील.

**१२. हमी शुल्क व दंडात्मक तरतूद :**

उपलब्ध पाण्याचा इष्टतम वापर व्हावा, आरक्षित पाणी विना वापर राहू नये यासाठी बिगरसिंचन वापरकर्त्यास टप्पानिहाय पाणीवापराच्या नियोजनासाठी मुभा देण्यात येत आहे. बिगरसिंचन पाणी वापरकर्ता त्यांना मंजूर पाणी वापराचा विनियोग टप्प्या टप्प्यात करणार असल्यास याबाबतचे नियोजन त्यांनी जलसंपदा विभागास करार करणेपूर्वी द्यावी. तशी तरतूद करारात करण्यात यावी. पाणीपट्टी आकारणी टप्पेवार केलेल्या नियोजनावर आधारित असेल.

प्रत्यक्ष पाणी वापर टप्पा नियोजनातील पाणी पाच वर्षात न वापरल्यास ते पाणी नियोजन रद्द करावे, किंवा जेवढे वापरले त्याव्यतिरिक्तच्या ज्यादा पाण्याचे, टप्पा नियोजनातील पाणी रद्द करावे.

जलप्रशुल्काची आकारणी ही टप्पा नियोजनामधील पाणी वापरानुसार करण्यात यावी. मात्र उर्वरित पाण्याच्या परिमाणावर (एकूण मंजूर पाणी टप्पा नियोजनातील पाणी) ५% दराने हमीशुल्काची आकारणी करावी.

प्रत्यक्ष पाणी वापर टप्पा नियो जनातील पाणी वापराच्या परिमाणाच्या ९०% पेक्षा कमी असल्यास टप्पा नियोजनातील परिमाणाच्या ९०% इतक्या परिमाणावर आकारणी करावी. प्रत्यक्ष वापर हा टप्पा नियोजनातील परिमाणाच्या ९०% ते १००% या मर्यादेत असल्यास अनुज्ञेय दराने आकारणी करावी. मात्र प्रत्यक्ष वापर टप्पा नियोजनातील परिमाणाच्या १००% पेक्षा जास्त असल्यास अशा जास्तीच्या परिमाणावर अनुज्ञेय दराच्या दीड पट दराने आकारणी करावी. तथापि, मंजूर पाणी कोट्याच्या १००% पेक्षा जास्त ते १२५% पर्यंत वार्षिक पाणी वापराकरिता अनुज्ञेय दराच्या दीड पट दर आणि १२५% पेक्षा जास्त वापरास अनुज्ञेय दराच्या तीन पट दराने आकारणी करण्यात येईल.

---------------x---------------